## यादी क्रमांक ४

# तयार घर घेण्यासाठी / ज्या घराचे बांधकाम टप्प्याटप्प्याने पूर्ण व्हावयाचे आहे असे घर बांधण्यासाठी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करावयाची असल्यास घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी लागणारी आवश्यक ती माहिती / कागदपत्रे

**( अग्रिम मंजूरीची मर्यादा - अग्रिम मंजूरीच्या दिनांकाला प्रत्यक्ष असलेले कर्ज किंवा मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु. ७,५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम एकाच हप्त्यात मंजूर करण्यात येईल. )**

१) नांव :- पद :-

२) कार्यालयाचे नांव :-

३) आपले सध्याचे मूळ वेतन :-

४) शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक :-

५) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६) कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे पदनाम :-

७) कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक :-

८) अग्रिमाची मागणी किती रुपयाची आहे. :-

९) अग्रिम मंजूर झाल्यास अग्रिमाच्या परतफेडीची आपली क्षमता (दरमहा) किती आहे ते नमूद करावे. (किमान व कमाल रक्कम नमूद न करता एकच रक्कम नमूद करावी.)

१०) शासनमान्य खाजगी वित्तीय संस्थांकडून किंवा शासनमान्य अन्य वित्तीय संस्थांकडून घरबांधणीच्या प्रयोजनार्थ कर्ज घेण्याकरिता राज्य शासकीय कर्मचाऱ्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९८१ मधील संबंधित नियमानुसार शासनाची / सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेंतलेली असावी किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाबाबत कर्मचाऱ्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला सूचित केलेले असावे व अशा प्रकरणी कर्ज घेण्यास कार्योत्तर परवानगी दिलेली असावी.

११) ज्या शासनमान्य वित्तीय संस्थेकडून अग्रिम किंवा कर्ज घेंतले आहे, त्याचा तपशील.

१२) घराच्या किंमतीविषयी मूल्यांकन अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र.

१३) राज्य शासकीय कर्मचारी त्या घराचा उपयोग स्वतःच्या निवासासाठी करीत असला पाहिजे किंवा स्वतःच्या निवासासाठी करणार असला पाहिजे, याबाबतचे शपथपत्र

कृ.मा.प.

१४) तयार घर घेंण्यासाठी अग्रिम मागणाऱ्या कर्मचाऱ्यांची शासनाच्या सेवेतील भरती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेली असली पाहिजे आणि अशा प्रकारे करण्यात आलेल्या नियुक्ती नंतरची अखंड सेवा कमीत कमी १० वर्षाची असली पाहिजे. तर ज्या घराचे बांधकाम टप्प्याटप्प्याने पूर्ण व्हावयाचे आहे. त्यासाठी अग्रिम मागणाऱ्या कर्मचाऱ्यांची कमीत कमी ५ वर्ष अखंडीत सेवा झालेली असली पाहिजे.

१५) यापूर्वी आपण जर घर खरेदीकरिता किंवा घरबांधणीकरिता शासकीय किंवा निमशासकीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास त्याचा तपशील द्यावा व सदर संस्थेचे सध्या किती कर्ज परतफेड करावयाचे आहे याबाबत सदर संस्थेचे प्रमाणपत्र सादर करावे.

१६) आपली पत्नी / पती शासकीय / निमशासकीय कार्यालयात नोकरीला आहे काय ? असल्यास त्यांनी शासकीय / निमशासकीय कार्यालयातून घरबांधणी अग्रिमांतर्गत यापूर्वी कर्ज घेतलेले आहे काय ? कर्ज घेतलेले असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

१७) तयार घर किंवा बांधावयाचे घर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या स्वतःच्या नावावर असले पाहिजे आणि असे घर महाराष्ट्रात असले पाहिजे.

१८) कर्ज घेऊन बिल्डरकडून घर / फ्लॅट खरेदी केला असल्यास घर / फ्लॅट खरेदीच्या नोदणीकृत करारनाम्याची साक्षांकित प्रत किंवा घर बांधले असल्यास घर बांधकामास सक्षम प्राधिकाऱ्याकडून मिळालेल्या बांधकाम परवानगीची व घर पूर्णतेबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

१९) घर / फ्लॅटची चालू वर्षासाठी भरण्यात आलेल्या कराच्या पावतीची साक्षांकित प्रत.

२०) घरबांधणी / खरेदीच्या प्रयोजनार्थ शासकीय / निमशासकीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास त्यास संचालनालयाकडून कार्योत्तर मंजूरी मिळाल्यास, घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी अनुज्ञेयतेनुसार घरबांधणी अग्रिम मंजूर करता येईल. मात्र प्रथम संचालनालयास कार्योत्तर मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

२१) ज्या घरासाठी कर्ज घेतले त्या ठिकाणी या घरा व्यतिरिक्त स्वतःचे, पत्नीचे अथवा आपल्या अज्ञान (Minor Children) मुलाचे नावे कोणतेही घर नाही याबाबतचे शपथपत्र.

२२) आपणास अनुज्ञेय ठरत असलेल्या अग्रिम रकमेपेक्षा कर्ज परतफेडीची रक्कम जास्त असल्यास उर्वरित रक्कम आपण उभारु शकाल का ? व ते उभारण्याचे मार्ग कृपया नमूद करावे.

२३) कार्यालयातील देयके ज्या कोषागार / उपकोषागार कार्यालयात सादर करुन पारित केली जातात, त्या कार्यालयाचा पत्ता.

१८) खाली नमूद केलेली कागदपत्रे अग्रिमाची रक्कम आपणास प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत मंत्रालयास सादर करणे आवश्यक असल्याने ते एका महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतचे हमीपत्र.

**कर्मचाऱ्याची स्वाक्षरी**

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त बाबींपैकी कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावरुन तपासण्यात आली असून नमूद केलेली माहिती बरोबर आहे.

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
**व पदनाम**

---

**टीप :** **१)** मिळणारी मंजूर रक्कम निधी उपलब्ध असल्यास शक्यतो एकाच हप्त्यात देण्यात येईल.

२) पती व पत्नी दोघेही शासकीय सेवेत असल्यास दोहोपैकी फक्त एकासच घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय ठरते.

---

**अग्रीम मंजूरीची रक्कम कोषागारातून काढून आपणास प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत खालील काग्रदपत्रे सादर करावी लागतील.**

१) आपल्या कार्यालयाने मंजूर रक्कम उपलब्ध करुन दिल्याचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक इत्यादी.

२) ज्या संस्थेकडून कर्ज घेतले असेल त्या संस्थेंला अग्रिमाची रक्कम दिल्यानंतर व संस्थेकडून मिळणारी मुद्रांकित पावती (रु. १/- च्या रेव्हेन्यु स्टँपवर संस्थेच्या अधिकृत प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीसह)

३) घराचे गहाणखत बी-३ (निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेले)

४) कर्जाची पूर्णपणे परतफेड झाल्याच्या दाखल्याची प्रत.

५) घराचा विमा शासकीय विमा निधीकडे काढल्याची विमा पावती.